**प रि प त्र क :–**

क्र. का.५/मुद्रांक परतावा/१४०९ ते १४४०
नोंदणी महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य,
पुणे यांचे कार्यालय, पुणे - १
दिनांक २४.११.१९८६

प्रति,

सर्व सह जिल्हा निबंधक व
मुद्रांक जिल्हाधिकारी.

विषय :- मुंबई मुद्रांक कायदा १९५८ (सुधारीत १९८५) अन्वये निरुपयोगी मुद्रांकाचे अनुमत रक्कमेची मंजूरी परतावा प्रकरणी देताना छाननीसाठी स्विकारावयाची कार्यपध्दती व काळजी.

मुंबई मुद्रांक कायदा १९५८ (सुधारीत १९८५) चे कलम ५२ (अ) चे नविन तरतूदीनुसार आता निरुपयोगी मुद्रांकाचे रक्कमेचा परतावा देतांना मंजूर रक्कमेवर आधारीत अधिकारांचे विभाजन करण्यांत आले असून दुरुस्त तरतूदीनुसार रुपये १०,००० पर्यंतचे मुद्रांक शुल्काचे परताव्याची प्रकरणेच मुद्रांक जिल्हाधिकारी यांना निकालांत काढता येतात व त्यावरील रक्कमेची प्रकरणे रु. ५०,००० पर्यंत मुख्य महसूल नियंत्रक प्राधिकारी यांचे निर्णयाकरीता व त्यापुढील रक्कमेची परतावा प्रकरणे शासनाचे निर्णयाकरीता पाठवावयाची असतात. नियम ५२ (अे) (।) मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे वस्तुतः अशी प्रकरणे मुख्य महसूल नित्रंयक प्राधिकारी यांचेकडे पाठवितांना आवश्यक ती चौकशी पूर्ण करणे व त्यांचे छाननी नंतर आपले अभिप्रायासह पाठविणे जरुर आहे, परंतु सध्या या कार्यालयाकडे अशी प्रकरणे पाठवितांना योग्य ती काळजी घेतली जात नाही व अपुऱ्या माहितीचे अशा प्रकरणांची हाताळणी होते, परिणामी संबंधित अर्जदारांत उचित न्याय मिळण्यास अनाठायी उशिर होतो हीबाब गंभीर व दोषास्पष्ट मानण्यांत येत आहे.

हा विलंब टाळण्याकरीता असे प्रस्ताव सादर करण्यापूर्वी मुंबई मुद्रांक नियम १९३९ मधील नियम २१ या पुर्णपणे अवलंब करणे जरुर आहे ही स्वयंस्पष्ट तरतूद आहे. अशी चौकशी पूर्ण झाल्यानंतर आपल्या अभिप्रायासह प्रकरणे अग्रेषित करतांना पुढील बाबींचा समावेश आपल्या प्रस्तावांत होईल याची संबंधित मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी योग्य ती काळजी घेणे जरुर आहे.

१. मुद्रांक परताव्याचा अर्ज योग्य व्यक्तिने सादर केला आहे व मुखत्यारपत्र दिले असल्यास ते सर्व तपशीलासह परतावा रक्कम स्विकारण्यांस पुरेसे आहे.

२. हया परतावा प्रकरणांत अर्जातील कारणांची व तपशीलांची मिमांसा करतांना योग्य ती शपथपत्रे जबान्या, लेख घेतले आहेत व परतावा अर्जावर निर्णय देतांना ती पुरेशी आहेत.

३. तशीच छाननी करुन मुद्रांक कागदावरील शेरे, प्रमाणपत्रे व योग्य त्या अधिकाऱ्याचे शेरे हे संबंधित अर्जदाराचे मुद्रांक परताव्याचे मागणी करीता कलम ५२ मधील तरतूदीनुसार पुरेसे आहेत.

४. परतावा रक्कमेबाबत अर्जाची शिफारस करतांना व नाकारतांना अर्जाची तारीख, मुद्रांक खरेदीची तारीख इत्यादी तपशील, तसेच कोणत्या कलमाखाली व उपकलमाखाली परतावा मागणी विचारांत घेता येईल यासह मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी स्पष्ट अभिप्राय दिला पाहिजे. तसेच मुद्रांकाचा वापर लक्षात घेवून नेमका कोणत्या अनुमत रक्कमेचा परतावा देणे जरुर आहे याची ही शिफारस करणे जरुर आहे.

५. अनुमत रक्कमेचा परतावा अर्जाचे तपशीलानुसार कोणाचे नावे आदेश देवून काढावा याचाही अभिप्राय या प्रस्तावांत देणे जरुर आहे.

तरी सर्व मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी या सूचनांचे तंतोतंत पालन करुन आपले मुद्रांक परतावा प्रस्ताव यापुढे हाताळावे व सादर करावेत व उलट विचारणां वा पृच्छा यांची जरुरी पडणार नाही याची दक्षता घ्यावी. अशा त्रुटी आढळून प्रस्ताव निर्णयास उशिर झाला तर संबंधित मुद्रांक जिल्हाधिकारी यांना जबाबदार धरण्यांत येईल याची नोंद घ्यावी.

कृपया या परिपत्रकाची पोहोच दयावी.

का. प्र. मा. नों.म.नि.
याची अनुमती.

सही/
(वा. दि. पालकर)
कार्यासन अधिकारी क्र.५ व सहाय्यक
नोंदणी महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य,
पुणे-१